संपादकीय
राकेश शंकर गोरे


# गळचेपीचा निलंबन पॅटर्न



आपण लोकशाहीतील संसदीय कामकाजाच्या प्रथा-परंपरा मानतो, असे किमान दाखवण्याचा प्रयत्न करण्याची गरजही सत्ताधारी भाजपला वाटेनाशी झाली असेल, तर ते चिंताजनक आहे. 'नवे संसदभवन भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत नवा इतिहास घडवेल', असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भवनाच्या उद्घाटनाच्या दिमाखदार सोहळ्यात काढले होते. मात्र, या नव्या वास्तूत होत असलेल्या संसदेच्या पहिल्याच अधिवेशनात जे काही घडले, त्याची नोंद भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नव्हे तर काळ्याकुट्ट अक्षरांत होणार आहे. त्यातील एक घटना म्हणजे या संसदभवनाची सुरक्षाव्यवस्था भेदून लोकसभा सभागृहात दोन युवकांनी प्रेक्षक सज्जातून मारलेल्या उड्या ही असली तरी त्यानंतर या विषयावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी निवेदन करावे, अशी मागणी करणाऱ्या विरोधी खासदारांवर उचललेला बडगा ही संसदीय प्रथा-परंपरांना नख लावणारी बाब आहे. सभागृहात जे काही घडले, त्याकडे 'नेहमीचाच विरोधकांचा गोंधळ आणि नियमानुसार त्यांच्यावर झालेली कारवाई' या सरधोपट दृष्टिकोनातून पाहणे म्हणजे समस्येचे गांभीर्य कमी करण्यासारखे होईल. संसदेच्या सभागृहात गोंधळ घालणे, घोषणाबाजी करणे हे गैरच आहे. परंतु एका अत्यंत संवेदनक्षम प्रश्नावर गृहमंत्र्यांच्या निवेदनाच्या मागणीकडेही दुर्लक्ष केले जात असेल तर विरोधक अस्वस्थ होणार हे उघड आहे. पण संवादातून त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून झाला नाही, त्यामुळे सत्ताधारी पक्ष बहुमतशाहीच्या जोरावर लोकशाहीचा संकोच करीत असल्याचे चित्र उभे राहिले आहे. एकाच दिवसांत (सोमवारी) लोकसभा तसेच राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील ७८ खासदारांना निलंबित केले गेले, तर दुसऱ्याच दिवशी आणखी ४९ विरोधी खासदारांवर हीच कारवाई करण्यात आली. हे सत्ताधाऱ्यांच्या उद्दाम प्रवृत्तीचे तर निदर्शक आहेच; शिवाय त्यामुळेच सत्ताधारी भारतीय जनता पक्ष थेट संसदेतीलच विरोधी आवाज कसा दाबून टाकू पाहत आहे, तेही समोर आले आहे. गेल्या आठवड्यात ही मागणी करणाऱ्या १४ खासदारांवर अशीच कारवाई करण्यात आली होती.

त्यामुळे नरेंद्र मोदी सरकारला आपल्या दुसऱ्या सत्राच्या शेवटच्या अधिवेशनात विरोधकांच्या रिकाम्या बाकांपुढे बघत हवे ते कामकाज मंजूर करून घेण्याची इच्छा आहे की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. पूर्वी सरकार विरोधकांचे मत किमान जाणून घेण्याचा तरी प्रयत्न करत असे आणि बॅ. नाथ पै वा अटलबिहारी वाजपेयी या त्यावेळच्या विरोधी नेत्यांच्या भाषणांच्या वेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारखा पंतप्रधान सभागृहात आवर्जून उपस्थित राहत असे. आता तर सभागृहात या दोन युवकांनी धूरकांड्या आणल्याची गंभीर घटना घडल्यानंतरही मोदी वा शहा यांच्यापैकी कोणीही लोकसभेत पाऊलही टाकलेले नाही. यावरून सत्ताधारी पक्षाची या घटनेकडे बघण्याची काय प्रवृत्ती आहे, तेच दिसून आले आहे. खरे तर या इतक्या गंभीर घटनेनंतर त्यासंदर्भात गृहमंत्र्यांनी निवेदन करावे, या विरोधकांच्या मागणीत गैर काय होते? अमित शहा जातीने त्यासंदर्भात काही निवेदन करते, तर विरोधकांचा हा प्रश्न धसास लावण्याचा उद्देशच संपुष्टात आला असता. पंतप्रधान मोदी यांनी ही घटना अत्यंत गंभीर असून, विरोधकांनी त्याचे राजकारण करू नये, असे अखेर सांगितले खरे; पण ते सभागृहाबाहेर. लोकसभेची सुरक्षाव्यवस्था भेदण्याची घटना घडल्यानंतर. त्याबाबतचे निवेदन हे सभागृहातच व्हायला हवे होते. पंतप्रधानांनी जे काही सभागृहाबाहेर सांगितले तेच शहा सभागृहात सहज सांगू शकले असते. शिवाय, आपण लोकशाहीतील संसदीय कामकाजाच्या प्रथा-परंपरा मानतो, असा किमान देखावाही सत्ताधारी पक्ष उभा करू शकला असता. ही आयती चालत आलेली संधी सत्ताधाऱ्यांनी गमावली. सत्ताधाऱ्यांच्या या संसदेकडे दुर्लक्ष करण्याच्या मानसिकतेमुळे साहजिकच विरोधकांना बळ आले आणि त्यांनी अत्यंत आक्रमकपणे हा मुद्दा लावून धरला. भाजप विरोधी बाकांवर असताना, 'संसदेच्या कामकाजात अडथळे आणणे, हाही संसदीय कामकाजाचाच एक भाग आहे!' असे जाज्वल्य उद्गार मोदी यांचे जवळचे मित्र आणि माजी मंत्री अरुण जेटली यांनी काढले होते. मात्र, बाके बदलली आणि मानसिकता थेट विरोधी आवाज बंद करण्यापर्यंत जाऊन पोचली, असेच हे निलंबनसत्र सांगत आहे. शिवाय, हे वर्तन लोकशाहीतील तर नाहीच नाही, ते हुकुमशाही प्रवृत्तीचेच निदर्शक आहे. अवघ्या दोन आठवड्यांपूर्वी तीन राज्यांत मिळवलेल्या मोठ्या विजयामुळे सत्ताधाऱ्यांमध्ये दिसत असलेला हा उन्मत्तपणाच म्हणावा लागेल. संसद चालवणे ही लोकशाहीत प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाची जबाबदारी असते. विरोधी मतांचा आदर करून त्यांच्याशी संवाद साधायला हवा. मात्र,अलीकडे हे सारेच सुविचार अडगळीत जाऊन पडले आहेत. त्यामुळे भाजपच्या शब्दकोशातील 'लोकशाही'चा अर्थ कसा वेगळा आहे, यावर पुनश्च एकवार प्रकाश पडला आहे. सत्ताधारी पक्ष अशा रीतीने विरोधकांना नामशेष करू पाहात असेल तर मग विरोधक संतप्त होऊन अध्यक्षांपुढील मोकळ्या जागेत घोषणा देत गेले वा त्यांनी फलक फडकवले तर त्यास गैर म्हणण्याचा अधिकारच सत्ताधारी पक्षाला राहत नाही. मात्र, राज्याराज्यांत मिळत असलेल्या विजयामुळे 'हम करे सो कायदा' ही प्रवृत्ती वाढीस लागलेली दिसते. ती लोकशाहीस घातक आहे.

# SUPERFOOD CABBAGE : KNOW THESE 7 BENEFITS OF THIS LEAFY VEGETABLE



Cabbage, often overlooked in the realm of superfoods, is a cruciferous vegetable that packs a punch when it comes to health benefits. Beyond its humble appearance, this leafy green vegetable is a nutritional powerhouse, offering several advantages for overall wellness. In this article, we will delve into 7 remarkable health benefits of cabbage that might just inspire you to include more of this cruciferous delight in your diet.

**Loaded with nutrients:** Cabbage is a low-calorie, high-nutrient vegetable. It contains an abundance of vitamins C and K, essential for immune function and blood clotting, respectively. Additionally, cabbage provides a good dose of vitamin B6, folate, and manganese, supporting various bodily functions.

**Cancer prevention:** Cruciferous vegetables like cabbage contain compounds known as glucosinolates, which have been linked to cancer prevention. These compounds break down into bioactive substances that may help inhibit the growth of cancer cells and reduce the risk of certain cancers, including colorectal and breast cancer.

**Boosts Immunity:** Vitamin C, a powerful antioxidant present in cabbage, plays a crucial role in supporting the immune system. Regular consumption of cabbage can help strengthen your body's defence against infections and illnesses.

**Improves digestion:** Cabbage is an excellent source of dietary fibre, promoting a healthy digestive system. Fiber aids in maintaining regular bowel movements, preventing constipation, and supporting gut health. The sulfur compounds in cabbage also contribute to the reduction of inflammation in the digestive tract.

**Anti-inflammatory properties:** While inflammation helps fight infection and heal, chronic inflammation fuels diseases. Cabbage, rich in antioxidants like sulforaphane and kaempferol, helps combat this chronic inflammation, reducing disease risk and supporting overall health. Studies show higher cruciferous veggie intake lowers inflammation markers, making it a simple yet powerful dietary weapon.

**Heart health:** Red cabbage packs a heart-healthy punch! It boosts key antioxidants like beta-carotene and lutein, lowers harmful LDL cholesterol, and fights inflammation, all helping to keep your heart singing and arteries clear.

**Control cholesterol:** Though cholesterol is crucial for digestion and hormones, high LDL cholesterol can lead to heart issues. Thankfully, cabbage's soluble fibre helps lower bad cholesterol, making it a heart-healthy dietary ally.

# साताजन्माच्या गाठी ! मुग्धा-प्रथमेश अडकले लग्नाच्या बेडीत




झी सध्या मनोरंजन विश्वात लग्नाचे वारे वाहत आहेत. एका मागोमाग एक सेलिब्रिटी विवाहबंधनात अडकत आहेत. गेल्या कित्येक दिवसांपासून 'सा रे ग म प लिटिल चॅम्प्स' फेम मुग्धा वैशंपायन आणि प्रथमेश लघाटे यांच्या लग्नाची लगबग सुरू होती. गुरुवारी मुग्धा आणि प्रथमेश यांनी लग्नाच्या बेडीत अडकून नवीन आयुष्याला सुरुवात केली. मित्रपरिवार, नातेवाईक आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात चिपळूणमध्ये मुग्धा-प्रथमेशचा विवाहसोहळा पार पडला. 'सा रे ग म प लिटिल चॅम्प' फेम मोदक आणि मॉनिटर म्हणजेच प्रथमेश आणि मुग्धाने काही महिन्यांपूर्वीच त्यांच्या प्रेमाची कबुली दिली होती. त्यानंतर त्यांनी साखरपुडाही उरकला होता. हे कळताच त्यांच्या चाहत्यांना सुखद धक्का बसला होता. आता ही सुरेल जोडी कायमची लग्नबंधनात अडकली आहे. मुग्धा आणि प्रथमेशच्या लग्नाला गायक रोहित राऊतनी हजेरी लावली होती. रोहितने सोशल मीडियावर मुग्धा-प्रथमेशच्या लग्नातील गोड क्षणाचा फोटो शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मुग्धा आणि प्रथमेशने त्यांच्या आयुष्यातील या खास क्षणासाठी पारंपरिक केला होता. मुग्धाने पिवळ्या रंगाची नऊवारी साडी नेसून मराठमोळा लूक केला होता. तर प्रथमेशही धोतरमध्ये राजबिंडा दिसत होता. त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

प्रथमेश आणि मुग्धाची भेट अगदी लहान वयातच सारेगमप शोमध्ये झाली. दोघांच्याही गाण्याचा जॉनर एक असल्याने नंतर त्यांनी एकत्र शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम केले. तेव्हाच दोघांचे सूर जुळले. मुग्धा-प्रथमेशने रेशीमगाठ बांधल्याने चाहतेही आनंदी आहेत.

# 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मालिकेत रूपालीचं सत्य अव्दैतला समजणार !!



सातव्या मुलीची सातवी मुलगी मालिका आता उत्कंठावर्धक वळणावर आली आहे. विरोचक कोण याचं उत्तर प्रेक्षकांना मिळालं आहे. मात्र अजून विरोचक कोण हे अव्दैतला कळलं नाहीय. नेत्रा-इंद्राणीने जंगलात सर्पलिपीच्या अर्थाविषयी लपवून ठेवलेलं रहस्य रूपालीला नागामुळे कळतं. त्यात तिला कळतं की ती विरोचक आहे. त्याचबरोबर कलियुगात तिचा सेवक अव्दैतच्या रूपात वावरत आहे. रूपालीला विरोचकाचं सत्य कळल्यावर नेत्रा-इंद्राणी आणि शेखरला आश्चर्य वाटतं. आता काहीही करून अव्दैतला जपायला हवं त्याचबरोबर रूपालीचं खरं रूप सगळ्यांसमोर होण्यासाठी योजना आखायला हवी, असं ते तिघे ठरवतात. अव्दैत नेत्राला प्रश्न विचारतो की जर मी विरोचकाचा सेवक होतो, तर कलियुगात आता विरोचक कोण आहे. त्याचवेळी नेत्रा ठरवते की आता अव्दैतपासून सत्य लपवण्यात काहीच अर्थ नाही. योजना आखल्याप्रमाणे नेत्रा-इंद्राणी आणि शेखर, रूपालीला आपल्या जाळ्यात ओढतात. रूपालीला त्यांच्या योजनेचा पत्ता लागत नाही. त्यामुळे ती त्यांच्या जाळ्यात ओढली जाते. ज्यामुळे अव्दैतला रूपालीचं खरं रूप कळतं. नेत्रा-इंद्राणी आणि शेखर नेमकी कोणती योजना आखतात? अव्दैतला रूपालीचं सत्य कसं समजणार? अव्दैत त्यावर विश्वास ठेवणार का तसेच विरोचक म्हणून रूपाली तिने केलेल्या गुन्ह्यांचं टोक गाठणार का? या सगळ्या प्रश्नांची उत्तर जाणून घेण्याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे.

# पिंपरीत ८० कोटी खर्चून निर्माण केलेलं नाट्यगृह म्हणजे पांढरा हत्ती; प्रशांत दामले यांची टीका



मराठी महापालिकेने तब्बल ८० कोटी रुपये खर्च करून उभारलेले नाट्यगृह रंगकर्मीसाठी केवळ पांढरा हत्ती ठरल्याच आता स्पष्ट झालाय. कारण, या नाट्यगृहाच्या उभारणीत अनेक त्रुटी असून इथे नाटकांचे प्रयोग होऊच शकत नाही, असे परखड मत अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष, जेष्ठ रंगकर्मी आणि अभिनेते प्रशांत दामले यांनी गुरुवारी चिंचवड येथे व्यक्त केले. पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले. शतक महोत्सवी नाट्यसंमेलनाचे बिगुल वाजले असून, अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या माध्यमातून शहरामध्ये तयारीला जोरदार सुरुवात झाली आहे. गुरुवारी चिंचवडगाव, मोरया गोसावी क्रीडा संकुल, काकडे पार्क, चिंचवड येथे भूमीपूजन व मंडपपूजन समारंभ झाला. मंगलमूर्तीवाड्यामध्ये अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या मध्यवर्ती शाखेचे अध्यक्ष प्रशांत दामले व उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते आरती केली. त्यानंतर उपस्थित मान्यवर मोरया गोसावी क्रीडा संकुल येथे पोहोचले. त्याठिकाणी भूमी पूजन व मंडपं पूजन झाले.

यावेळी प्रशांत दामले, भाऊसाहेब भोईर, महाराष्ट्र चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, राजेशकुमार साकला, कृष्णकुमार गोयल, राजेश जैन, राजेंद्र शिंदे, नाट्य परिषद बारामती शाखा अध्यक्ष किरण गुजर, तळेगाव शाखा अध्यक्ष सुरेश धोत्रे, नेपथ्यकार शाम भूतकर, नियामक मंडळ सदस्य समीर हम्पी, सत्यजित धांडेकर, नगरसेवक शत्रुघ्न काटे, मोरेश्वर शेडगे, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे तसेच नाट्यकर्मी उपस्थित होते. प्रशांत दामले म्हणाले, नाट्यगृह उभारणीचे काही गणिते असतात ती चुकली की केवळ खर्च वाढतो आणि हा प्रकार पिंपरी चिंचवड महापालिकेनं उभारलेल्या या ग.दि. माडगूळकर नाट्यगृहाच्या बाबतीत घडला आहे. भाऊसाहेब भोईर म्हणाले की, शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलन नाट्य संमेलनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड शहरात होत आहे. शतक महोत्सवी नाट्य संमेलनाचे आयोजन करण्याची संधी पिंपरी चिंचवड शाखेला मिळत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. सोहळ्याची तयारी सुरू झालेली आहे.

## HEALTH AND SPORTS

### 'I QUIT WRESTLING' - SAKSHI MALIK BREAKS DOWN AFTER SANJAY SINGH'S SELECTION AS WFI PRESIDENT



**NEW DELHI :** In a major event, Sakshi Malik gave up wrestling amid Sanjay Singh's selection as Wrestling Federation of India President on Thursday, December 21. India's top female wrestler announced her decision to quit wrestling during a joint press conference in New Delhi. The 31-year-old star was the first-ever female wrestler to win a medal at the Summer Olympics. She claimed the historic bronze at the 2016 Rio de Janeiro Olympics and holds medals in Commonwealth and Asian Games as well. "Today, we all witnessed what unfolded," Sakshi told reporters. "Brijbhushan's right-hand person became the president. Our demand was for a female president, and it's disappointing to see that no female was elected. The battle will persist, and the next generation of wrestlers will also have to fight. "We slept for 40 days on the roads and a lot of people from several parts of the country came to support us. If Brij Bhushan Singh's business partner and a close aide is elected as the president of WFI, I quit wrestling." Sakshi held the press conference with fellow wrestlers Bajrang Punia and Vinesh Phogat to show their displeasure at Sanjay Singh's selection as WFI President. Sanjay is a close aide of the former WFI chief Brij Bhushan Singh and beat Commonwealth Games gold medallist Anita Sheoran by a margin of 40:7. Bajrang Punia and Vinesh Phogat also shared their feelings and criticized the decision. "We weren't fighting the government, our fight was with a particular person who was molesting our sisters everyday. He used everything to give different deviations to the case because he has power, this shows nobody's future is safe," Bajrang Punia said. "There are minimal expectations but we hope that we get justice. It's saddening that the future of wrestling is in the dark. To whom shall we convey our grief?... We are still fighting," Vinesh Phogat said..

### 'ROHIT SHARMA, FOR ME, IS A QUESTION MARK IN T20': MANJREKAR'S RAZOR-SHARP REMARK AFTER HARDIK'S ASCENSION AS MI CAPTAIN



**NEW DELHI :** The Mumbai Indians, gearing up for the 2024 IPL season, made a significant move earlier this month as they appointed Hardik Pandya as their new captain. Hardik returned to the Mumbai Indians after two years in a trade last month, having been released by the franchise ahead of the 2022 mega auction. Despite the decision to name Hardik as captain, Rohit Sharma remains a part of the team, and the management emphasized that Rohit will continue to play a pivotal role during this transition. The announcement sparked a flurry of reactions on social media, with some criticizing the Mumbai Indians for removing Rohit as captain. Hardik Pandya, however, brings proven leadership skills to the table, having led the Gujarat Titans to an IPL title in his inaugural season as skipper in 2022. He also took the Titans to another final this year but faced a defeat against MS Dhoni-led Chennai Super Kings. Nevertheless, with Hardik's demonstrated leadership prowess, the Mumbai Indians are poised for an intriguing season in 2024. While Rohit Sharma's batting credentials are unquestionable, there have been concerns about his T20 form over the past few IPL seasons. Rohit last breached the 400-run mark in the league in 2019, scoring 405 runs in 15 IPL games. Subsequently, his performances dipped with 332, 381, 268, and 332 runs in the next four seasons for MI. Despite Rohit showcasing an aggressive approach in the 2023 World Cup, leading India to the final, doubts persist regarding his T20 batting approach.

### BCCI PROVIDES CRUCIAL INJURY UPDATE ON RUTURAJ GAIKWAD; RAJAT PATIDAR MAKES ODI DEBUT AGAINST SOUTH AFRICA IN DECIDER



**NEW DELHI :** Speed merchant Mukesh Kumar almost provided KL Rahul's Team India with an early breakthrough when his angling delivery into off-stump outsmarted Reeza Hendricks. The delivery created a catching opportunity for Ruturaj Gaikwad, who was stationed at slip during the 2nd One Day International (ODI) against hosts South Africa at St George's Park in Gqeberha on Tuesday. Opener Gaikwad not only failed to cash in on the opportunity but he also ended up injuring his finger on the final ball of the fifth over. When the cameras panned to Gaikwad, the Indian opener was receiving treatment from the medical staff as he went off the field. Receiving a lifeline from the visitors in the powerplay, opener Hendricks scored a gritty half-century and the star batter also stitched a match-winning partnership with Tony de Zorzi. Opener Zorzi's maiden century sealed South Africa's comfortable win over India in the 2nd ODI. With India meeting hosts South Africa for the third and final ODI of the series on Thursday, the Board of Control for Cricket in India (BCCI) confirmed that opener Gaikwad was unavailable for the visitors. "Ruturaj Gaikwad hasn't fully recovered from the blow he sustained to his ring finger while fielding in the second ODI. He remains under the supervision of the BCCI Medical Team," the BCCI said in a statement.

### ASHISH NEHRA DROPS CRISP STATEMENT ON SHUBMAN GILL'S CAPTAINCY APPOINTMENT



**NEW DELHI :** The biggest announcement from the Mumbai Indians (MI) franchise arrived even before the mini-auction for the upcoming season of domestic cricket's biggest extravaganza - the Indian Premier League (IPL). The record-time winners completed a blockbuster trade for Hardik Pandya with Gujarat Titans (GT) in an all-cash deal after the end of the retention deadline. Days after sanctioning Hardik's homecoming for IPL 2024, the Mumbai Paltan announced the changing of guards as the white-ball maverick replaced Rohit Sharma to become the new leader of the franchise. While MI revealed Pandya as the successor of Rohit at Mumbai, 2022 winners Gujarat Titans promoted opener Shubman Gill to the top post. The former world No.1 batter became the captain of Gujarat Titans after Mumbai confirmed the signing of Hardik for IPL 2024. Talking about the leadership change at Gujarat Titans, head coach Ashish Nehra admitted that it will be difficult for his franchise to replace Pandya, who guided GT to IPL glory in their debut season. "To replace a player like Hardik Pandya is difficult considering his talent and experience. We have seen how he (Gill) has shaped up in the past three-four years. He is 24-25 years of age but he has a good head on his shoulders," Nehra shared his views in a virtual press conference after the IPL 2023 mini-auction in Dubai. India's all-format opener Gill was the leading run-getter for the Titans last season.

### 5 WAYS PROTEINS HELP US TO STAY FIT DURING WINTER



While winter symbolizes cold and lazy days, it also depicts festivities and food. The cold weather brings along allergies and infections and hence one needs to be extremely mindful of their diet. Having healthy nutritious foods should become a regime along with increased physical activity. Hence, our body needs proteins every day. A healthy adult requires around 0.6-0.8g of protein per kg of body weight. Dals, lentils, beans, chickpeas, soybeans, quinoa, nuts, and seeds, dairy, eggs, poultry, fish, and meat are good sources of proteins. Let us see how proteins help us stay fit during winter : Increase muscle mass: Proteins help to maintain our muscle mass and also encourage muscular development during strength training. It also prevents muscle loss during weight reduction and hence sufficient amount of protein is required daily. Boost immunity: During the winter season, when colds and flu are more prevalent, a strong immune system is crucial for fighting off infections and illnesses. Proteins are essential for the development of antibodies that help eliminate bacteria or viral infections and boost our immune system. Low protein status can increase the risk of infections. Protein-rich sources are also rich in Vit B complex, Vit E, Vit K, zinc, magnesium, selenium, phosphorus, calcium, omega 3 fatty acids and fibre which help the gut microflora to stay healthy to fight against infections. Provides energy: Proteins can serve as an energy source when required, especially when there is not a sufficient amount of readily available carbs. Nuts and seeds eaten at snack time can provide energy, keep us full, control our appetite, and even prevent overeating. Improve metabolism: During winter, our core body temperature drops and the body uses more energy to generate heat and keep it warm. This involuntary muscle tensing can increase our metabolic rate two to four times. Proteins have a higher thermic effect compared to fats and carbohydrates, meaning they require more energy to be metabolized. This contributes to the generation of heat in the body.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

